ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# स्त्री मुक्ती चळवळतील राजश्री शाहू महाराज यांचे योगदान

**देशमुख प्रतीक्षा ब्रह्मदेव**
*संशोधक विद्यार्थी*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

***गोषवारा:***
*महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीत राजश्री शाहू महाराजांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावलेली होती.राजश्री शाहू महाराज कृतिशील समाजसुधारक होते. स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी अनेक कायदे कोल्हापूर संस्थानात केले होते.स्त्रियांना शिक्षण मिळावे ही त्यांची आग्रही भूमिका होती. त्यादृष्टीने शिष्यवृत्ती व मोफत शिक्षण यासारख्या अनेक योजना कोल्हापूर संस्थानात त्यांनी राबविला होता.*

***की वर्ड्स-***
*1. विधवा पुनर्विवाहाचा कायदा*
*2. हिंदू वारसा दुरुस्तीच्या कायदा*
*3. विवाह वयोमर्यादा निश्चित*
*4. फिमेल ट्रेनिंग स्कूल*
*5. 1918 चा जाहीरनामा*

**प्रस्तावना:**

एकोणिसावे शतक विविध चळवळींच्या दृष्टीने महत्वाचे होते. स्वातंत्र्याची चळवळ,सत्यशोधक चळवळ,दलित चळवळ, स्त्रीमुक्तीची चळवळ या सर्व चळवळींचा पाया 19व्या शतकात घातला गेला.यामध्ये स्त्री मुक्ती चळवळ या कालावधीतील अत्यंत महत्त्वाची चळवळ होती. एकोणिसाव्या शतका पर्यंत स्त्रियांवर अनेक बंधने घालण्यात आली होती त्याविरुद्ध अनेक समाजसुधारक पुढे आले आणि त्यांनी स्त्रियांवरील बंधने दूर करून त्यांना मनुष्य म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला. यामध्ये कोल्हापूर संस्थानाचे राजे राजश्री शाहू महाराज यांनी स्त्रियांसाठी केलेल्या सुधारणा अतिशय महत्वाच्या होत्या, पण तरीदेखील स्त्री सुधारणांच्या इतिहासात शाहू महाराजांच्या या कार्यावर फारसा प्रकाश टाकण्यात आलेला नाही. यादृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधात राजश्री शाहू महाराज यांच्या स्त्री सुधारणांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे

**उद्दिष्टे:**

१. शाहू महाराजांच्या स्त्रियांवरील बंधने दूर करण्यासाठी केलेल्या कायद्यांवर प्रकाश ढाकणे.
२. शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेल्या सुधारणांची माहिती मिळवणे.
३. शाहू महाराज यांनी स्त्री शिक्षणासाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती मिळवणे.

**गृहीतक:**

१. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अनेक स्त्री विषय सुधारणा केल्या होत्या.
२. शाहू महाराज यांनी स्त्री शिक्षणासाठी विविध योजना राबवल्या.
३. शाहू महाराजांनी स्त्रियांवरील बंधने दूर करण्यासाठी अनेक कायदे केले होते.

**व्याप्ती व मर्यादा:**

स्त्री मुक्ती चळवळ मध्ये अनेक समाजसुधारकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली गेली असली तरी प्रस्तुत शोधनिबंधात राजश्री शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात केलेल्या श्री विषयक सुधारणांचा आढावा घेतला जाणार आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध माहिती संकलन वर्णनात्मक संशोधन पद्धती ऐतिहासिक संशोधन पद्धती यांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**विषय ज्ञान:**

महाराष्ट्राच्या स्त्री सुधारणा चळवळीच्या इतिहासात गोपाळ गणेश आगरकर,महात्मा फुले,विठ्ठल रामजी शिंदे,महर्षी धोंडो केशव कर्वे,राजश्री शाहू महाराज या सर्वांनी अतिशय महत्त्वाचे योगदान दिले होते. परंतु, राजर्षी शाहू महाराज यांच्या स्त्री विषयक सुधारणांवर फार मोठ्या प्रमाणात आजतागायत प्रकाश टाकण्यात आलेला नाही. त्यांच्या इतर सुधारणांचे प्रमाणे स्त्रीविषयक सुधारणा देखील अतिशय महत्त्वाच्या होत्या.1842 ते 1922 या कालखंडात कोल्हापूर संस्थानाचे राजर्षी शाहू महाराज हे राजे होते.या कालखंडात स्त्रीयांचे सामाजिक व शैक्षणिक सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला. याची फारशी चर्चा होत नाही त्यांची कुणी दखल फारश्या प्रमाण घेत नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. शाहू महाराजांनी स्त्री उद्धाराचे केलेले कायदे त्यांची दूरदृष्टी स्पष्ट करते.दक्षिण महाराष्ट्रात 16 संस्थाने होती, भारतात 562 संस्थाने होती.परंतु कोणतेही संस्थानाने राजश्री शाहू महाराजां सारखे काय ते स्त्रियांसाठी लागू केले नव्हते. शाहू महाराज कृतिशील सुधारक होते. कोल्हापूर संस्थानात समतेवर आधारित नव समाज निर्मितीचे कार्य त्यांनी केले राजश्री शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा कारभार हातात घेतला तेव्हा इतर जिल्ह्यात प्रमाणे कोल्हापूर मध्ये सती प्रथा, स्त्री शिक्षणावर बंदी, बालविवाह,विधवा विवाह बंदी, विषम विवाह, बहुपत्नीत्व, केशवपन या अनिष्ट प्रथा समाजात होत्या.शाहू

महाराजांनी या सर्व प्रथांना फक्त विरोध केला नाही. तर याविषयी सुधारणा देखील केल्या.स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने अनेक अनुकूल पावले त्यांनी उचलली त्या काळात उच्च वर्गाकडून मोठ्या प्रमाणात विरोध होता. शाहूची धाकटी सून इंदुमती राणीसाहेब या वयाच्या 11:30 व्या वर्षी विधवा झाल्या. त्यावेळी इंदुमती ने स्वताच्या पायावर उभे राहावे असे शाहू महाराजांचे मत होते. त्यासाठी त्यांनी इंदुमती यांना शिकवण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांना अनेकांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. सर्व विरोधाला बाजूला सारून त्यांनी इंदूमती त्यांच्या शिक्षणासाठी सोनतळी ला खास आश्रम उघडला. त्याकाळात बालविवाह होत साथीचे रोग मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे बालविवाहाचे प्रमाण समाजात जास्त होते. त्यासाठी शाहू महाराजांनी जुलै 1917 मध्ये विधवा पुनर्विवाहाचा कायदा पास केला.

जातीजातीतील बंधनांना देखील त्यांनी विरोध केला होता त्यानुसार संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना जातिनिर्बंध न पाहता दोन पैकी कोणत्याही धर्माच्या मनुष्याचे विवाह करण्याची मुभा दिली. विधवा पुनर्विवाह आरती एका कायद्यानुसार पुरुषाचे वय 18 वर्षे व स्त्रीचे वय 14 वर्षे असावे असा निर्बंध घातला.अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या स्त्रीला व साठी विद्यार्थी व पालकांची संमतीची गरज नाही.आपला पती निवडण्याची स्वातंत्र्य अठरा वर्षावरील वय असणाऱ्या मुलींना त्यांनी या कायद्याने दिले हा कायदा म्हणजे स्त्री पुरुष स्वातंत्र्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी शंभर वर्षापूर्वी उचललेले एक क्रांतिकारी पाऊल होते. 11 जुलै 1919 रोजी काडीमोड कायदा त्यांनी पास केला. पती-पत्नीचे जमत नसेल तर त्यांना कायदेशीर रित्या विभक्त होण्यास परवानगी दिली. पुरुष वर्गाकडून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार आळा बसावा म्हणून त्यांनी हा कायदा पास केला.त्याच बरोबर शाहू महाराज यांनी 17 जानेवारी 1920 रोजी हिंदू वारशाच्या कायद्याच्या दुरुस्तीचा कायदा पास केला. त्यानुसार सर्व वर्णाच्याअनौरस संततीला जनक वडिलांच्या मिळकतीत वारसा हक्क मिळाला.पतित स्त्रियांच्या उध्दाराचा याद्दष्टीने हे कलम महत्त्वाचे होते मुलींच्या शिक्षणासाठी देखील बरे असे कार्य शाहू महाराजांनी केले. रखमाबाई शेवळकर या महिलेची महिला शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक केली.तसेच प्रशिक्षित शिक्षिका मिळाव्यात म्हणून फिमेल ट्रेनिंग स्कूल या संस्थेची स्थापना केली. मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ज्या शाळेत जास्त असेल त्या शाळेतील शिक्षकांना 512 रुपये बक्षीस देण्याची प्रथा त्यांनी सुरू केली. हुशार मुलींना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी चौथी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या मुलींना चाळीस रुपये प्रमाणे 5 शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली. रखमाबाई केवळ कर यांच्या कन्या कृष्णाबाई यांना मुंबईत व परदेशात उच्च शिक्षण घेण्यास सर्व सहकार्य केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांच्याकडे कोल्हापूरच्या सरकारी हॉस्पिटलची महत्त्वाची कामे सोपवली. मागासलेल्या जातीतील स्त्रियांना शिक्षणासाठी 11 ऑक्टोबर 1919 रोजी जाहीरनामा काढून लॉजिंग बोर्डिंग मोफत व्यवस्था केली. राजाराम महाविद्यालयात मुलींना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली शाहू महाराजांचे वरील सर्व निर्णय महिला सबलीकरणासाठी अतिशय महत्त्वाचे होते. शाहू महाराज तोफखाने व भास्करराव जाधव यांच्या मध्ये स्त्री शिक्षणा बाबत चर्चा होत त्यावेळी शाहू महाराज एक प्रसंगी बोलले होते," हल्लीच्या मुलींना बरे वाईट योग्य-अयोग्य हे समजण्याची शक्ती ज्या शिक्षणा मध्ये आहे असे शिक्षण मुलींना दिले पाहिजे असे शिक्षण देणारे गुरुजन जर चारित्र्यसंपन्न असतील तर त्या मुली बेताल होणार नाही" शाहू महाराजांच्या प्रयत्नाने कोल्हापूर मध्ये व्ही.टी.पाटील यांनी ताराराणी विद्यापीठाची स्थापना करून तेथील स्त्री शिक्षणाचा पाया विस्तृत व भक्कम करण्याचा प्रयत्न केला.

**सारांश:**

अशाप्रकारे महाराष्ट्रातील स्त्री सुधारणा कोल्हापूर संस्थानाचे राजे राजश्री शाहू महाराज यांनी अतिशय महत्त्वपूर्ण अशी कामगिरी केलेली होती. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कायदे त्यांनी पास केले होते स्त्री शिक्षणाला गती देण्यासाठी अनेक संस्थांची स्थापना त्यांनी केली होती.स्त्रियांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी अनेक योजना त्यांनी राबवल्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी मोफत शिक्षण व लॉजिंग-बोर्डिंग ची व्यवस्था स्त्रीयांसाठी केली.

**संदर्भसूची:**


१. *सूर्यवंशी गणपतराव सुबराव, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, इचलकरंजी, 1978*
२. *कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती मुंबई, 2001*
३. *साळुंके हिंदुराव, छत्रपती शाहू स्मृती दर्शन, कोल्हापूर, 1989*
४. *जोगळेकर मृणालिनी, स्त्री अस्मितेचा आविष्कार भाग-तीन, पुणे 1991*